


# बाईकांनी जायचे कुठे?
## अस्वच्छतेमुळे आजाराचा धोका

मुंबई, दि. २४ : प्रतिनिधी

मुंबई आणि ठाण्याला जोडणाऱ्या लाल बहादूर शास्त्री मार्गावरील सुलभ शौचालये अत्यंत अस्वच्छ आहेत. एकवेळ पुरुषांना त्यांचा वापर करता येईल, पण बाईमाणसांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. बहुमतांशी शौचालये अस्वच्छ असल्याने ती असून नसल्यासारखीच आहेत. तर काही रस्त्याच्या आड असल्याने रात्री त्याचा वापर करणेही गैरसोयीचे असल्याचे वास्तव महिलांनी मांडले आहे. अस्वच्छ शौचालयांमुळे आजारपण वाढण्याची भीती महिलांनी व्यक्त केली आहे.

सायन रेल्वे स्थानकापासून ठाण्यापर्यंतचा एलबीएसचा प्रवास सुरू केल्यानंतर धारावी नेचर पार्क, कुर्ला कोर्ट, कल्पना सिनेमापर्यंत स्वच्छ शौचालये नजरेस पडत नाहीत. येथील फुटपाथवरच्या गटारातच रात्री-अपरात्री आडोशाचा आधार घेत पुरुषांना लघुशंका उरकावी लागते. घाटकोपर दिशेकडील चिराग नगरच्या विरुद्ध बाजूकडील फुटपाथवरच अनेकांकडून लघुशंका केली जाते. अंधेरी कुर्ला जोड रस्त्यावर काळे मार्गावरील पालिका उद्यानालगतच्या शौचालय वापराबाबत असंख्य अडचणी आहेत.

**३ किलोमीटर मार्गावर शौचालय**

घाटकोपर ते मानखुर्द दरम्यान बैंगणवाडी परिसरात ३ ते साडेतीन किमी अंतरावर पालिकेचे एकमेव शौचालय आहे. पैसे देऊन त्याचा वापर करावा लागतो. मात्र महिलांना पैसे देऊनही त्याचा वापर करता येणार नाही एवढे ते अस्वच्छ असते. याकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

**फुटपाथवरच पुरुषांची लघुशंका**

१. बैलबाजार पोलीस चौकीपासून साकीनाक्याला जाणाऱ्या रस्त्यावर विमानतळाच्या भिंतीलगतचा फुटपाथही लघुशंकेसाठी वापरला जातो. जरीमरीपासून साकीनाक्यापर्यंत पुरुषांना लघुशंकेसाठी शौचालये असली तर महिलांची अडचण या संपूर्ण पट्ट्यात आहे.

२. कमानीपासून कोहिनूर सिटीकडे जाताना असलेल्या शौचालयालगत काम सुरू असल्याने बॅरिकेट्स लागवण्यात आले आहेत. हे शौचालय महिलांना वापरता येत नाही.

३. विद्याविहार रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेला बस स्टँडलगतचे शौचालय पुलाच्या कामामुळे जमीनदोस्त केले आहे. कुर्ला रेल्वे स्तानकाच्या पश्चिम बाजूला बस स्टँडलगतच्या शौचालयाचीही तीच तऱ्हा आहे.

# मुंबईतील कनेक्टिव्हिटीचे प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येणार - मुख्यमंत्री

मुंबई, दि. २४ : प्रतिनिधी

मुंबईतील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी विविध पायाभूत प्रकल्पांची कामे आगामी पाच वर्षात पूर्ण करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुंबईच्या पूर्व-पश्चिम तसेच उत्तर-दक्षिण जोडणीला वेग देणार, अनेक महत्त्वाचे प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करण्यात येणार आहेत.

मुंबईतील वरळी डोम येथे इंडियाज् इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनाईट नेशन्स (आयआयएमयूएन) आयोजित 'यूथ कनेक्ट' कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सी-लिंकचा वर्सोवा-दहिसर-भाईंदरपर्यंत विस्तार, दहिसरकडील नवीन लिंक रोड, फ्री-फ्लो ब्रिजेस, तसेच विविध टनेल प्रकल्पांमुळे मुंबईतील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल. सध्या मुंबईतील 60 टक्के वाहतूक पश्चिम द्रुतगती मार्गावर असल्याने या क्षेत्राला पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

बीकेसी ते इतर भागांना जोडणारे बोगदे, नवीन लिंक रोड नेटवर्क, ओव्हर एक्स्प्रेसवे कनेक्शन आदी प्रकल्पांमुळे शहरातील प्रवासाचा सरासरी वेग मोठ्या प्रमाणात वाढेल. मुंबईत पूर्णत: बोगदे रस्ते तयार करण्यात येणार आहेत. पुढील पाच वर्षात मेट्रोचे संपूर्ण जाळे तयार होणार आहे. हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबईतील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम



आणि वापरण्यास सोपी बनेल. 'मुंबई वन' हा एकात्मिक मोबिलिटी ॲप नागरिकांसाठी वन-स्टॉप सोल्युशन असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पालकांमध्ये खासगी शाळांविषयी आकर्षण वाढल्याने शासकीय व महानगरपालिका शाळांची संख्या कमी होत आहेत असे चित्र समोर आले. परंतु वास्तवात परिस्थिती बदलत आहे. महानगरपालिकांच्या शाळांना आंतरराष्ट्रीय मानकांपर्यंत नेण्याचा संकल्प असून मुंबई महानगरपालिकाकडे ती क्षमता आहे. शासकीय शाळांना योग्य प्रशिक्षण, अध्यापन पद्धती आणि पायाभूत सुविधा दिल्यास त्या खासगी शाळापेक्षा सरस ठरतील, असेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

लोकशाही अधिक सक्षम आणि सर्व समावेशक करण्यासाठी युवांचा सहभाग अत्यावश्यक आहे. आजच्या लोकशाहीत युवा नागरिक फक्त दर्शक नसून स्वतःचे मत असलेले महत्त्वाचे स्टेकहोल्डर्स आहेत. युवांच्या मतांना स्थान दिल्याशिवाय लोकशाहीची प्रक्रिया पुढे जाऊ शकत नसल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पर्यावरण बदल ही केवळ पुस्तकी चर्चा नसून वास्तवातील मोठी समस्या आहे. आपण हवामान बदलाचा अनुभव घेणारी पहिली पिढी आहोत आणि त्याबद्दल काहीतरी करू शकणारी शेवटची पिढी आहोत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही प्रदूषणाची सर्वात मोठी कारणे असतात, त्यामुळे मुंबईत वाहतूक व्यवस्था इलेक्ट्रिक करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मेट्रो संपूर्णपणे इलेक्ट्रिक आहे. पुढील टप्प्यात सार्वजनिक वाहतुकीला पूर्णपणे शून्य-उत्सर्जनच्या दिशेने नेणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अनेक वर्षे मुंबईचे सांडपाणी थेट समुद्रात सोडले जात होते, मुंबईसारख्या महानगराचा 100 टक्के सीवेज समुद्रात टाकला जाणे योग्य नाही. त्यामुळे नियम तयार करून आता संपूर्ण मुंबईत सीवेज ट्रीटमेंट प्लांट्स उभारत आहोत. पुढील वर्षापर्यंत 100 टक्के ट्रीटेड पाणीच समुद्रात सोडले जाईल. त्याचबरोबर धारावीच्या पुनर्विकासात 30 टक्के क्षेत्र पूर्णपणे अनडेव्हलपेबल ठेवले जाणार असून त्यामुळे प्रचंड प्रमाणात ओपन आणि ग्रीन स्पेसेस निर्माण होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# अंधेरीतील वायुगळतीचे गूढ कायम!

मुंबई, दि. २४ : प्रतिनिधी

अंधेरी एमआयडीसीतील भंगारवाडी शनिवारी वायूगळतीत गुदमरून एकाचा मृत्यू झाला असून दोघांची प्रकृती गंभीर आहे. मात्र ही वायूगळती नेमकी कशामुळे झाली याचे गूढ अद्याप कायम आहे.



मुंबई महापालिकेच्या आपत्कालीन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी सायंकाळी 5 वाजता ही दुर्घटना घडली. एमआयडीसी पोलीस ठाण्याजवळील एका तीन मजली इमारतीत अचानक गॅस गळती सुरू झाली. यामुळे अहमद हुसेन (20), नौशाद अन्सारी (28) आणि सना शेख (17) या तिघांना श्वास घेण्यास त्रास होत त्यांची प्रकृती बिघडली. त्यानंतर अग्निशमन दल घटनास्थळी दाखल होत या तिघांना रुग्णालयात दाखल केले. यातील अहमद हुसेन (20) याला डॉक्टरांनी मृत घोषित केले. तर नौशाद अन्सारी (28) आणि सना शेख (17) या दोघांना अतिदक्षता विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आल. त्यांची प्रकृती गंभीर आहे.

अंधेरीतील गॅस गळती नेमकी कशामुळे झाली याबाबतची माहिती अद्याप समजू शकलेली नाही. अग्निशमन दलाचे पथक आणि प्रशासनाचे अधिकारी या गॅस गळतीचे कारण शोधण्याचा प्रयत्न सुरू आहे. या गॅसगळतीमुळे आणखी कोणी जखमी झाले आहे का? याचाही शोध घेतला जात आहे. अनेकदा गॅस गळतीमुळे आग लागण्याचा धोका असतो. मात्र आगीची कोणतीही घटना घडली नसल्यामुळे पुढील अनर्थ टळला.

## 'मालमत्ता असो वा नसो, वृद्ध आई-वडिलांना सांभाळणे मुलांची कायदेशीर जबाबदारी'

मुंबई, दि. २४ : प्रतिनिधी

"आई-वडिलांची काळजी घेणे आणि त्यांचे पालनपोषण करणे हे ज्येष्ठ नागरिकांच्या देखभाल आणि कल्याण कायदा, २००७ अंतर्गत मुलांचे बिनशर्त कर्तव्य आहे. मुलाकडे पालकांच्या मालमत्तेचा ताबा आहे की नाही, तसेच मालमत्ता वारसा हक्काने मिळणार आहे का, यावर ते अवलंबून नाही," असे महत्त्वपूर्ण निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने नोंदवले. वृद्ध आणि आजारी असणाऱ्या पालकांचा त्याग किंवा दुर्लक्ष करणे हे ज्येष्ठ नागरिकांसाठी सन्मान, आरोग्य आणि अर्थपूर्ण जीवन सुनिश्चित करणाऱ्या घटनात्मक आणि वैधानिक हमींच्या केंद्रस्थानी असल्याचेही न्यायमूर्ती ए.एस. गडकरी आणि न्यायमूर्ती रणजितसिंह राजा भोसले यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.

'लाईव्ह लॉ'ने दिलेल्या वृत्तानुसार, श्रीमती मोहिनी पुरी (वय ७६) यांना २४ ऑगस्ट २०२५ रोजी गंभीर स्ट्रोक आल्यामुळे वांद्रे येथील होली फॅमिली हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. रुग्णालयाचे सुमारे १६ लाख बिल झाले. यानंतरही रुग्णालयाने त्यांच्यावर उपचार सुरू ठेवले होते. मुलाने वैद्यकीय निष्काळजीपणाचे आरोप लावले, आईच्या देखभालीची जबाबदारी टाळत राहिला. याविरोधात वांद्रे येथील होली फॅमिली हॉस्पिटल सोसायटी आणि त्यांच्या रुग्णालयाने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेत न्यायमूर्ती ए.एस. गडकरी आणि न्यायमूर्ती रणजितसिंह राजा भोसले यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. या प्रकरणात सहभागी असलेल्या पोलीस अधिकारी आणि ज्येष्ठ नागरिक ट्रिब्युनल यांच्या निष्क्रियतेबद्दल न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. खंडपीठाने स्पष्ट केले की, मुलाने आईला हॉस्पिटलमध्येच सोडून दिले. या वस्तुस्थितीची जाणीव झाल्यावर कायद्यानुसार कारवाई करण्याची जबाबदारी पोलीस आणि ज्येष्ठ नागरिक ट्रिब्युनलची होती. त्यांची निष्क्रियता ही 'देखभाल आणि ज्येष्ठ नागरिक कल्याण अधिनियम, २००७' च्या मूळ उद्देशालाच हरवते, असेही खंडपीठाने सुनावले.

खंडपीठाने ज्येष्ठ नागरिक कायद्याच्या कलम ४ आणि २३ चा संदर्भ देत स्पष्ट केले की, पालकांची देखभाल करण्याचे मुलाचे कर्तव्य "बिनशर्त आहे आणि ते जन्मामुळे निर्माण होते. तर नातेवाईकांचे कर्तव्य मालमत्ता ताब्यात असणे किंवा वारसा हक्कावर अवलंबून असते. मुलांचे त्यांच्या पालकांची किंवा ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेण्याचे बंधन आणि कर्तव्य हे पालक किंवा ज्येष्ठ नागरिकांच्या मालमत्तेचा ताबा असण्यावर अवलंबून नाही. हे बंधन मुलावर जन्मतःच आहे आणि ते बिनशर्त आहे. नैतिक आणि पवित्र कर्तव्य असण्यासोबतच, हा कायद्याने लादलेला वैधानिक कर्तव्य देखील असल्याचे निरीक्षण न्यायमूर्ती ए.एस. गडकरी आणि न्यायमूर्ती रणजितसिंह राजा भोसले यांच्या खंडपीठाने नोंदवले.

# मुंबईत मोठ्या हर्षोल्हासात क्षेत्रीय निरंकारी बाल संत समागम संपन्न

मुंबई, दि. २४ : प्रतिनिधी

सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या पावन मार्गदर्शनानुसार मुंबईच्या चेंबूर, वडाला व गोरेगांव येथील निरंकारी सत्संग भवनांमध्ये रविवार, दि.23 नोव्हेंबर 2025 रोजी मोठ्या हषोल्हासपूर्ण वातावरणात क्षेत्रस्तरित निरंकारी बाल संत समागम संपन्न झाले.




"मुले केवळ सांगून शिकत नाहीत तर ज्येष्ठांचे आचरण पाहूनच शिकत असतात. ती ज्येष्ठांचे अनुकरण करतात."

संत निरंकारी सत्संग भवन, चेंबूर येथे आयोजित बाल संत समागमामध्ये मुख्य मंचावरुन प्रवचन करताना दिल्लीहून आलेले निरंकारी ब्रह्मज्ञान प्रचारक आदरणीय श्री.मनिष खन्ना यांनी उक्त विचार व्यक्त केले. या बाल समागमामध्ये चेंबूर ते मुलुंड व मानखुर्द परिसरातील निरंकारी बालक व त्यांचे पालक मिळून सुमारे 2000 भक्तगणांनी भाग घेतला.

श्री.खन्ना यांनी पुढे सांगितले, की संतांच्या सान्निध्यात येऊन सतगुरुंची दिव्य शिकवण अंगीकारुन बालपणातच धैर्य, विनम्रता, क्षमा करणे व क्षमा मागण्याचे साहस यांसारखे दैवी गुण मुलांमध्ये सहजच पविष्ट होतात ज्यामुळे त्यांचे जीवन उज्ज्वल बनते.

ते पुढे म्हणाले, की आध्यात्मिकतेची सुरवात घरातूनच होते. जेव्हा आपण कुटुंबातील प्रत्येक सदस्यामध्ये प्रभूचे रुप पाहू लागतो तेव्हा सौहार्दाची भावना आपसूकच जागृत होते. त्यांनी मुलांना सहनशीलता, आदर-सत्कार व जबाबदारीची जाणीव करुन दिली आणि सत्संग, सेवा व स्मरण करत जीवनातील नकारात्मकता दूर करण्याची प्रेरणा दिली.

या बाल संत समागमात विविध भाषांमधून गीत, विचार व कवितांच्या माध्यमातून बाल संतांनी आपले भाव व्यक्त केले. शिवाय, काही शिक्षाप्रद लघुनाटिका सुद्धा प्रस्तुत केल्या ज्यामध्ये - 'मन विशाल असेल तर जीवन विशाल बनेल', ज्याची भक्ती, ज्याची पूजा त्याचे ज्ञान असे जरुरी' तसेच 'अहंकार व अभिमानी विचारांपासून दूर राहावे' यांचा श्रोत्यांनी आनंदही घेतला आणि कौतुकही केले.

वडाळा येथील नाडकर्णी पार्क भागात असलेल्या निरंकारी सत्संग भवनात याच दिवशी आयोजित क्षेत्रस्तरिय बाल संत समागमामध्ये चंदिगडहून आलेले निरंकारी प्रचारक आदरणीय डॉ.मोहित गुप्ता यांनी मुख्य मंचावरुन आपल्या विचारांमध्ये सांगितले, की उत्तम पालन-पोषण आणि सत्संगाचे पवित्र वातावरण चरित्र, करियर इतकेच नव्हे तर सुंदर जीवनाची निर्मिती करते. आत्ममंथन, करुणा, विनम्रता आणि सदाचाराची समज बालकांना माता-पित्यांकडूनच शिकायला मिळते.

या कार्यक्रमामध्ये नेव्ही नगर ते दादर परिसरातील निरंकारी बालक आणि त्यांचे पालक मिळून सुमारे 2000 श्रद्धाळू भक्तांनी भाग घेतला.

त्यांनी पुढे सांगितले, की आजच्या नकारात्मकतेने ग्रस्त जगामध्ये सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांनी ब्रह्मज्ञानाच्या माध्यमातून आमचे नाते परमात्म्याशी जोडलेले आहे ही फार मोठी कृपा असून त्यातनूच आम्हाला एकरस, सकारात्मक आणि प्रेममय जीवनाचा लाभ झाला आहे.

संत निरंकारी सत्संग भवन, वासरी हिल, गोरेगांव (प.) येथे विशाल रुपात बाल संत समागमाचे आयोजन करण्यात आले ज्यामध्ये बांद्रा ते भाईंदर पर्यंतच्या परिसरातून निरंकारी बालक व पालक मिळून सुमारे 3,500 हून अधिक भक्तगणांनी भाग घेतला. या समागमाची सुरवात संपूर्ण अवतार बाणी द्वारे करण्यात आली तर कार्यक्रमाध्ये पुढे बालकाकडून कव्वाली, अभंगवाणी व भक्तिगीते सादर करण्यात आली.

या ठिकाणी मुख्य मंचावरुन आपले विचार व्यक्त करताना राजेंद्र नगर, उत्तर प्रदेश येथून आलेले निरंकारी प्रचारक आदरणीय डॉ.विश्वदीप जुनेजा यांनी सांगितले, की ही निरंकारी बालकं खरं तर "बाल संत" असून आध्यात्मिक मूल्यांनी युक्त आहेत. त्यांनी बालकांना जीवनातील प्रथम गुरु माता-पित्यांचा सन्मान करण्यासह त्यांच्यासोबत नियमितपणे सत्संगामध्ये येण्याची प्रेरणा दिली.

या संत समागमामध्ये विविध शाखांमधील बाल युवा संतांनी हिंदी, मराठी, इंग्रजी, पंजाबी, गुजराती, कन्नड़, नेपाळी इत्यादि भाषांमधून अभंग, भक्तीगीते, विचार, कविता व लघु नाटिका प्रस्तुत केल्या. बुक रिडींग द्वारेही प्रेरणादायक विचार मांडण्यात आले. बाल संतांच्या सर्व प्रस्तुतींचे श्रोत्यांनी तोंडभरुन कौतुक केले.

# रिलायन्स जिओला ग्राहक वैतागले!
## कॉलवेळी ऐकायलाच येत नाहीय

मुंबई, दि. २४ : प्रतिनिधी

रिलायन्स जिओच्या नेटवर्क समस्येला गेल्या दोन महिन्यांपासून मोठे ग्रहण लागलेले आहे. कॉल केल्यावर समोरच्याला बोललेले ऐकायला जात नाहीय, समोरचा बोललेले ऐकायला येत नाहीय, अशी अवस्था झालेली आहे. ३५० रुपयांचे रिचार्ज मारून देखील ग्राहकांना नीट सेवा मिळत नाहीय, यामुळे युजर वैतागले आहेत.

अनेकदा फोन कनेक्ट करताना समस्या येत आहेत. अनेकदा तुम्हाला मिस्ड कॉलचे मेसेज येत आहेत. तुम्हाला ५जी रेंजचा लोगो तर दिसतोय परंतू तुम्ही इतरांसाठी नॉट रिचेबल असता. एखाद्या संकटाच्या वेळी किंवा महत्वाच्या कामाच्यावेळी जर असे झाले तर काय होणार, असा प्रश्न उभा राहत आहे.

अनेक ग्राहक जे बीएसएनएलवरून रिलायन्स जिओकडे पोर्ट झाले आहेत, ते बीएसएनएल परवडली असे म्हणत आहेत. एवढी वाईट अवस्था रिलायन्स जिओची झाली आहे. समोरच्याला एकाच कॉलमध्ये वारंवार 'ऐकायला आले नाही' असे सांगावे लागत आहे. कॉलिंगवेळी फोन मध्येच कट देखील होत आहे.

**३५० रुपये देऊनही...**

रिलायन्स हा सध्या मार्केट लीडर आहे. सुरुवातीला ११० रुपयांत अनलिमिटेड फोरजी देणाऱ्या जिओने आता ते रिचार्ज ५जी साठी ३५० रुपयांवर नेऊन ठेवले आहे. यामुळे एअरटेल, व्होडाफोन या कंपन्यांनी देखील आपली रिचार्ज याच किंमतीत नेऊन ठेवली आहेत. २५० चे रिचार्ज मारले तर ४जी ची रेंज येते, मग इंटरनेट २जी होऊन जाते, अशी अवस्था आहे. ५जी चे रिचार्ज मारावे म्हणून ही व्यवस्था असणार आहे. कारण जीपे, भीम ॲप देखील ओपन करायचे म्हटले की गोल गोल सर्कल फिरत राहते, अशी या नेटवर्कची अवस्था झाली आहे.

# शीळ-कल्याण रस्त्यावर देसाई खाडीत तरुणीचा मृतदेह

ठाणे, दि. २४ : प्रतिनिधी

शिळफाटा - कल्याण रस्त्यावरील देसाई खाडी पुलाखाली नदी पात्राच्या काठाला एका २५ ते ३० वर्षाच्या तरूणीचा सुटकेसमध्ये मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. सोमवारी दुपारी या पुलावरून जाणाऱ्या काही पादचाऱ्यांना हा मृतदेह निदर्शनास आला. शीळ डायघर पोलिसांना याप्रकरणाची माहिती देण्यात आली. पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. या तरूणीला घर किंवा अन्य ठिकाणी मारून तिला सुटकेसमध्ये भरून रात्रीच्या वेळेत देसाई खाडी किनारी आणून टाकले असावे असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.

देसाई खाडी पात्रात एका तरूणीचा मृतदेह एका सुटकेसमध्ये भरून आणून टाकला असल्याची माहिती मिळाल्यावर या पुलावरून जाणाऱ्या मोटार, दुचाकी आणि इतर वाहन चालकांनी वाहने थांबवून घटनास्थळाची आणि संबंधित कोणी परिचित आहे का यासाठी प्रयत्न केले. एकावेळी सर्वच वाहने पुलावर



थांबल्याने पुलाच्या एका मार्गिकेत कोंडी झाली होती. वाहतूक पोलीस आल्यानंतर त्यांनी एकाही वाहन चालकाला पुलावर वाहन उभे करू नये अशा सूचना केल्या. त्यामुळे पुलाचा मार्ग मोकळा झाला. तरीही अनेक वाहन चालक पुलाच्या दोन्ही बाजुला थांबून घटनास्थळाची माहिती घेत होते. ठाणे, मुंबई, कल्याण, डोंबिवली परिसरात कोठे तरूणी बेपत्ता असल्याची नोंद आहे का याचा तपास पोलीस करत आहेत. या नोंदीवरून या तरूणीची ओळख पटविणे आणि तिच्या नातेवाईकांचा शोध घेणे पोलिसांना शक्य होणार असून पोलीस तपास सुरु करण्यात आला आहे.


**ANAND RATHI**

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड,
एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे,
गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ भारत
Phone: : +91 8451942710| Website: www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड ["ARGFL"](सुरक्षित कर्जदार) यांच्याकडे सुरक्षित केलेली खाली वर्णन केलेली अनुसूची स्थावर मालमत्ता कर्ज खाते क्रमांक ARGFL/SME-LAP/MUM/1168 असलेली, ज्याचा भौतिक ताबा आहे, ती ऑनलाइन ई-लिलावाद्वारे https://sarfaesi.auctiontiger.net वेबसाइटद्वारे अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या तारखेला, जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते या आधारावर अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या एकूण रकमेची आणि त्यावरील करारात्मक व्याज आणि इतर खर्चाची वसुली करण्यासाठी विकली जाईल. आणि कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांकडून खाली नमूद केल्याप्रमाणे वसूल होण्याच्या तारखेपर्यंतचे शुल्क:

| | |
|---|---|
| कर्जदाराचे नाव: (१) मेसर्स एजिस इन्फ्रा सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड (कर्जदार) शाह कॉम्प्लेक्स क्रमांक १, सी विंग, दुकान क्रमांक १५, पाम बीच रोड, सेक्टर १३, सानपाडा, नवी मुंबई: ४०० ७०५. | |
| सह-कर्जदाराचे नाव: (२) श्री. आनंद प्रकाश शर्मा (सह-कर्जदार) फ्लॅट क्रमांक ६०५, शाह कॉम्प्लेक्स ४, प्लॉट क्रमांक १०, पाम बीच रोड, सेक्टर १४, सानपाडा, मुंबई: ४०० ७०५. (३) श्रीमती उर्मिला आनंद शर्मा (सह-कर्जदार) फ्लॅट क्रमांक ६०५, शाह कॉम्प्लेक्स ४, प्लॉट क्रमांक १०, पाम बीच रोड, सेक्टर १४, सानपाडा, मुंबई: ४०० ७०५. | |
| शेड्यूल: युनिट क्रमांक. ५०२, ए विंग, ५वा मजला, एव्हरेस्ट निवारा, इन्फोटेक पार्क १, टीटीसी औद्योगिक क्षेत्र, नवी मुंबई: ४०० ७०५. | |
| थकबाकी रक्कम (मागणी सूचनेनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह) | १,१९,८८,१०९/- रुपये (एक कोटी एकोणीस लाख अठ्ठ्याऐंशी हजार एकशे नऊ फक्त) |
| लिलावाची तारीख | २९ डिसेंबर २०२५ |
| राखीव किंमत | १,१४,०६,०००/- रुपये (एक कोटी चौदा लाख सहा हजार फक्त) |
| बयाणा पैसे ठेव | राखीव किमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | १०,०००/- रुपये (दहा हजार फक्त) |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ | २२ डिसेंबर २०२५ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत |
| केवायसी कागदपत्रांसह निविदा फॉर्म सादर करण्याची तारीख आणि वेळ/ईएमडीचा पुरावा इ. | २६ डिसेंबर २०२५ केवायसी कागदपत्रांसह दुपारी ४.00 वाजेपर्यंत |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | २९ डिसेंबर २०२५ सकाळी १०:00 ते दुपारी १.00 वाजेपर्यंत |
| टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार लिलाव प्रक्रियेच्या अटी आणि शर्तींसाठी आनंद राठी ग्रुपची वेबसाइट www.rathi.com ला भेट देऊ शकतात. | |

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) किंवा सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारांना ३० दिवसांची सूचना देखील आहे.

तारीख: २४ नोव्हेंबर २०२५
ठिकाण: मुंबई

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
अधिकृत स्वाक्षरीकर्ता



## बृहन्मुंबई महानगरपालिका

**वृक्ष प्राधिकरण**
**- जाहिर सूचना-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (जानेवारी, २०१८ पर्यंत सुधारलेला) कलम ८ (३) (क) मधील तरतूदीनुसार, परिमंडळ - ६ मधील 'एस' विभागातील ०१ प्रस्ताव असे **एकूण ०१** प्रस्ताव, मा. म.न.पा. आयुक्त, अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण / वृक्ष प्राधिकरण समिती यांच्या मंजुरीकरीता प्राप्त झाले आहेत.

उपरोक्त प्रस्तावांमधील बाधित झाडे कापणे | पुनर्रोपित करणेबाबत तपशील हा महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in - बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी विभाग आणि खाते खातेनिहाय माहिती पुस्तिका उद्याने व वृक्ष प्राधिकरण कागदपत्रे ९५ जाहीर सुचना ७ दिवस या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उपरोक्त प्रस्तावांविषयी नागरिकांच्या काही आक्षेप वा सूचना असल्यास सदर जाहीरात प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात विहित नमुन्यात (Prescribed Format) उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी यांच्या कार्यालयात सादर कराव्यात. तसेच, आपण आपल्या आक्षेप / सुचना विहित नमुन्यात (Prescribed Format) dysg.ta@mcgm.gov.in हया ई-मेलवरही नोंदवू शकतात.

विहीत मुदतीत सादर न झालेले आक्षेप / सूचनेचा विचार करता येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी. लेखी / ई-मेलद्वारे सुचना/आक्षेप पाठवुनही अति आवश्यक असल्यास आपण या सुचना / आक्षेपांच्या लेखी / ई-मेलच्या प्रतीसह व्यक्तीशः सुनावणीकरीता उपस्थित राहु शकता. सदर सुचना / आक्षेपाबाबतची सुनावणी दि.०३/१२/२०२५ रोजी उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी यांच्या कार्यालयात दुपारी ४.३० ते ०५.०० वाजेदरम्यान करण्यात येईल.

**उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी**
**उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी यांचे कार्यालय**
**वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणिसंग्रहालय,**
**२ रा मजला, हम्बोल्ट पेंग्विन कक्ष,**
**संत सावता माळी मार्ग,**
**भायखळा (पूर्व), मुंबई -४०००२७**
**दूरध्वनी क्र. २३७४२१६२**
**Email id- dysg.ta@mcgm.gov.in**

**सही/-**
**उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी**

**पीआरओ/२३६०/जाहि./२०२५-२६**

**थोडासाही ताप येता, डॉक्टरांना जाऊन भेटा**